International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# ‘भटक्या विमुक्तांचे साहित्य’

## ‘माकडीचा माळमधील भटक्या विमुक्तांचे समाजवास्तव

**प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर**
*प्रमुख - मराठी विभाग, भोगावती महाविद्यालय, कुरुकली*
*Corresponding Author – प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर*
DOI - 10.5281/zenodo.18654407

**प्रस्तावना :**

भटके विमुक्त म्हणजे सतत स्थलांतर करणारा समाज यातही दोन प्रकार ज्यांना निवाराच नाही तिथे कुठे गावकुसाच्याही बाहेर जागा मिळेल तिथे काही दिवस रहायचे नंतर तिथून निघून जायचे. यांच्यापैकी काही जाती गुन्हेगार म्हणून समोर आल्या त्यांना एका ठिकाणी रहावे बंधनकारक केले. ते विमुक्त स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांना मुक्त जीवन जगण्याची कायदेशीर परवागनी दिली ते गाव कुसाच्याही बाहेर ‘कसे पण’ नाही. पण ‘कसेतरी’ रहात. त्यांना कुठेतरी स्थिरता मिळालेली होती. असे हे भटके विमुक्त. त्यांच जगण दु:खाच्याही पलिकडच कष्टाच्याही पलिकडच तरीही ही माणस जगतात. दु:ख, दारिद्रय, अन्याय व अत्याचार हा त्यांच्याबरोबर सावलीसारखा असतो. ना गाव ना घर त्यांना कुणी कुठ जा म्हणायची गरजच नाही. निसर्गाचा, परिस्थितीचा संकेत ओळखून ही माणस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चालती होतात. अशा माणसाच चित्रणाची गुंफण माकडीचा माळ या कादंबरीत अण्णा भाऊराव साठे यांनी केलेली आहे. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न अशा विविधप्रश्नातंर्गत आणखीन काही बऱ्याच उपप्रश्नांची दखल या कादंबरीतून आलेली आहे. यातील प्रश्न हे समाज निरीक्षणातून आलेले नाहीत तर ते अण्णांनी स्वत: भोगलेले आहेत. विमुक्त गावाबाहेर रहाणारे मग भटके कसे तर विमुक्त व्यवस्थेने त्यांना भटके केले. त्या भटकंतीत त्यांना विविध प्रकारच्या लोकांना सोबत रहावे लागले. त्यांच्यासारखेच जगणे त्यांच्या वाट्याला आले. त्यांच्याही वाट्याला भटक्यांचे-विमुक्त्यांचे जीवन आले म्हणून ते स्वत: सहीतच जगणे ‘माकडीचा माळ’ मधून मांडते झाले. या कादंबरीतील माकडीचा माळावर गंग्या आणि रंगी नावाच्या माकडांना ज्या व्यंकुने पाळले त्याच्या मृत्यूनंतर स्वत; देहत्याग केला तिथेच त्यांना दफन केले म्हणून त्या माळाला माकडीचा माळ हे नाव पडले. माणसातील माणूसपण शोधावे आणि प्राण्यातील प्राणीतत्वाला माणूसकीचा आकार असतो हे साधार सत्यतेचे चित्रण या कादंबरीतून आलेले आहे. यातील समाजवास्तव कोणत्या प्रकारचे आहे? त्याचे स्वरूप कसे आहे? उपेक्षितांच्या जगण्याला आकार का येऊ दिला जात नाही? कोणतेही वैयक्तिक कारण नसताना वैराची सुडाची भावना का निर्माण होते? लेकी-सुना का असुरक्षित होतात? याची कारणे या कादंबरीच्या कथानकातून सांगितलेली आहेत. विषमतेमुळे समाज मनावर परिणाम होतच असतात. त्यामुळे जीवन मूल्यांवरचा विश्वास डळमळीत होत असतो. अण्णांचा लेखक म्हणून असा काहीसा विचार त्यांच्या समग्र साहित्यातून जाणवतो. असाच धागा पकडून त्यांचे लेखन होतच असते. मग ते एकेका पात्राकडून जीवन मूल्यांवरचा विश्वास दृढ करण्याविषयीची समाजमनाला शिकवण देतात. परिषदेच्या निमित्ताने मी ‘माकडीचा माळ’ या कादंबरीतील

भटक्या विमुक्त्यांचे समाज वास्तव मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'माकडीचा माळ' या कादंबरीचा विषय बोधकथेसारखा वाटतो. मला हे महत्त्वाचे वैशिष्ट्य वाटते. दिवाळी सणानंतर सुगीचे दिवस सुरु होतात. या दिवसात गावाच्या बाहेर पाल ठोकून भटक्यांचे तांडे काही दिवसासाठी रहातात. सुगी संपली कि गावाबाहेरचे त्यांचे तळ हलतात. आणि पुन्हा त्यांची भटकंती सुरु होते. या कादंबरीतूनही फिरत्या जातीच्या तांड्याचे जगण्यातील समाजवास्तव अण्णा मांडतात. त्यांच्या जगण्याच्या पद्धती, त्यांचे संघर्ष, व्यथा, वेदना, त्यांचे जीवन व्यवहार, स्वभाव वैशिष्ट्ये, नैतिकता व्यवसाय अशा अनेक जीवन घटकांना अनुसरून माकडवाले, सापगारुडी, डोंबारी, डवरी, दरवेशी, गोसावी, फासेपारधी, नंदीवाले या फिरत्या जमातीकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजाचा कसा असतो. हे सांगतानाच माकडवाल्याचा खेळ करणारा यंकू खेळासाठी पाळलेली माकडे, दुर्गा, यमू म्हणजेच यम्या, पर्वती डवरी म्हणजेच पऱ्या, विलासराव इनामदार, रंगराव पाटील, गंग्या माकड व रंगी माकडीन ही पात्रे यांच्याही स्वभाव वैशिष्ट्याचे चित्रण येते.

व्यसनाधिनता, कलाकरांचे आर्थिक प्रश्न, स्त्री जीवनाचे समाजवास्तव या तीन गोष्टी या कादंबरीत प्रकर्षाने जाणवतात. भटक्या समाजाचे भटकत जगणे, हेवे दावे, भूक, दु:ख व कुरघुडी यासारख्या अनेक नकारात्मक घटकांचे समाज वास्तवाचे चित्रण या कादंबरीत येते. कसेही असले तरी या माणसांची जगण्यावर निष्ठा आहे. अण्णा स्वत:च 'बरबाद्या कंजारी' च्या प्रस्तावनेत लिहितात. माझी जीवनावर निष्ठा असून मला माणस फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात व जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालत त्यांची झुंज ती त्यांचे यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रुप करण मला आवडत नाही.[१] ही माणसे आगळीक करतात. आगळीक सोसतात. यातील पाया हा असाच आहे. दारूचा आहारी गेलेल्या पाऱ्याला सत्य असत्य यातील फरक समजत नाही. तो सूडबुद्धिने जगत असतो. व्यसनामुळेच त्याच्या जवळचे मित्र गल्या व बल्या त्याला अपंग करतात. यानंतर तो तिरस्काराने दुर्गाविषयी विषारी विचार विलासराव इनामदार व रंगराव पाटील यांच्या मनात पेरण्यात यशस्वी होतो. दारू काढून विकतो व दारू विकण्यासाठी स्वत:च्या पोरीला उभा करतो. साहजिकच गावच्या पाटलापासून ते गल्या-बल्या सारखे दारू पिण्यासाठी येतात. त्यामुळे इतर भटक्या जमातीपेक्षा त्याच्याकडे जास्त पैसा येत असतो. याचा त्याला गर्व होतो.

या कादंबरीतील सर्व पात्रे व्यसनाच्या आहारी गेलेली आहे. त्याचे काही घटना –प्रसंग पुढीलप्रमाणे – हिकम्या गारुड्याचा साप यंकू माकडवाला याने मारल्याचे पाऱ्याला समजते. तो यंकूला मारतो. यंकू हा सरळमार्गी जगणारा आहे. तरी सतत अन्याय करण्याऱ्या पाऱ्याला सर्वासमक्ष मारतो. दुसऱ्या दिवशी पाऱ्याचे पिसाळलेला कुत्रा यंकूच्या अंगावर जातो. यंकू त्या कुत्र्यालाही मारतो. या दोन्ही घटनांमुळे यंकूच्या मनातील राक्षस जागा होतो. तो यंकूला जीवे मारण्याची व त्याचे कुटुंब उध्वस्त करण्याची धमकी देतो. पाऱ्या म्हणतो "हा हुशार अस. एक दिवस तुझी खांडोळी करीन तरच मी पाऱ्या? मी तुझी पोरगी पळविन, तिला मुंबईत नेऊन विकीन तिला कसबीन करीन." 'दारू' च्या आहारी गेलेल्या पाऱ्याला चांगले काय आणि वाईट काय याची शहानिशा करता येत नाही. एकूणच व्यसनाच्या आहारी गेलेली माणस वैचारिक प्रगल्भता कशी गमावून बसतात. हे या कादंबरीतून स्पष्ट होते. 'भूक आणि दु:ख हीच अण्णा भाऊंच्या लेखनामागील खरी प्रेरणा होती. भूक जेव्हा भागविली जात नाही. तेव्हा दु:ख आणि दैन्य निर्माण होते.'[२] समाजातील घनदांडगी माणसे समाजाचे अस्तित्व धोक्यात आणतात. हे अण्णा पाहत होते. अनुभवत होते. उपेक्षितांच्या डोळयातील दु:खाचे पाणी पुसणारे कुणीच

नसते. याउलट मरणासन्न माणसाच्या डोक्यावर पाय ठेवून धनदांडगा जगत असतो. आपल्या स्वार्थी हेतू सार्थ करण्याचा येणंकेन प्रकारे प्रयत्न करत असतो. यंकू आणि दुर्गाच्या बाबतीत असेच घडते. यंकू व दुर्गाच्या फरफटीला पाऱ्या जबाबदार आहेत. व्यसन हे समाजाला लागलेली कीड आहे. जो कोणी व्यसनात बुडाला किंवा व्यसनाच्या आहारी गेला तर त्याचे संपूर्ण कुटुंब उध्वस्त झाल्याशिवाय रहात नाही या व्यसनामुळे समाजाची सांस्कृतिक घडी विस्कटते. व्यसनामुळे व्यक्ति आणि व्यक्तिमुळे कुटुंब नंतर समाज कसा उध्वस्त होतो हे माकडीचा माळ मधून अण्णा भाऊनी सांगितलेले आहे.

या कादंबरीतून कलेचे व कलेसाठी लागणाऱ्या प्राण्यांचे समाजवास्तव येते. हा भटका समाज गावोगाव भटकत आपला उदरनिर्वाह करत असतो. 'यंकू' माकडाचा खेळ करतो, बाळया डोंबारी आपल्या दोन मुलींना घेऊन डोंबाऱ्याचा खेळ करत असतो. हिकम्या गारूड्याचे खेळ करून लोकांचे मनोरंजन करतो. हिकम्याच्या साप यंकूच्या पालात घुसतो यंकू सापाला ठार मारतो. त्याचे जगण्याचे साधन काळाच्या आधीन होते. तो गावच्या पाटलाकडे जाऊन आपली व्यथा मांडतो. आक्रोश करतो. त्याच्यासमोर पैशावाचून जगण्याचा प्रश्न निर्माण येतो. इथे 'जीवो जीवस्थ जीवनम्' हा विचार स्पष्ट होतो. यातून कलाकारांच्या कलेचा आस्वाद न घेता कलाकारांच्या कलेचाच घात करण्यासाठी अनेक मार्गाचा अवलंब केला जातो. त्यामुळे कलाकारांच्या सांस्कृतिक अस्तित्वाची घुसमट होते. यावरून समाजात कलाकारांचे सांस्कृतिक समाजवास्तव किती असुरक्षित आहे याची जाणीव होते.

भिक मागून जगणे ही माकडीच्या माळावरील भटक्यांची रोजच्या जगण्याचा पाठ आहे. यांना घरदार नाही. कोणत्यातरी गावाबाहेर शक्यतोवर तळ ठोकून कशीतरी गुजराण करणे. यातच ही माणसे गुरफटलेली असतात. याचाच गैरफायदा ते ज्या गावाबाहेर राहतात. त्या गावातील गाव प्रमुखांकडून घेतला जातो. याला त्यांच्या जातीअंतर्गत असणारा संघर्ष कसा जबाबदार असतो हे दुर्गाच्या ससेहोलपरीवरून लक्षात येते. जीवघेणा संघर्ष कशाला म्हणतात. याचा वास्तव परिचय माकडीचा माळ मधून येतो. 'अण्णांच्या अंत:करणात स्त्रियांबद्दल आदर आहे. स्त्रीचे दु:ख त्यांच्या हृदयात घर करते कारण ज्या समाजात अण्णाभाऊ जन्मले, जगले, वाढले त्या ग्रामीण तसेच शहरी समाज जीवनात स्त्री ही अनंत अत्याचाराची बळी ठरलेली आहे.'[३] अण्णांचे संपूर्ण जीवन उपेक्षित समाजात गेल्यामुळे स्त्रियांची विषण्ण करणारी परिस्थिती त्यांना परिचित होती. त्यांचा कादंबरीतील नायिका ह्या खडतर जीवन जगण्याचा स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतात. या कादंबरीतील दुर्गा ही त्याचेच प्रतिक आहे. त्याचबरोबर मनुष्य आणि प्राणी यांच्या जीवाभावाच्या नात्याचे दर्शनही या कादंबरीत होते. यंकू, दुर्गा व माकड गंग्या, माकडीन रंगी हा यंकूचा भटका संसार त्याचे जीवनतत्व वर्गात आणि माकडात गुंतलेले आहे आणि माकडीचा माळ ही कहाणी दुर्गाभोवतीचे फिरते आहे. दुर्गा यंकूची लाडकी लेक आहे. येमूवर निखळ प्रेम करणारी आहे. स्वाभिमानी, निर्भयी, जिद्दी दुर्गा वाचकाच्या मनात घर करून रहाते. या दुर्गासाठी जन्मदात्या पित्यापासून ते येमूप्रियकरापर्यंत आणि पाळलेल्या माकडांपर्यंत प्रत्येकजण तिच्यासाठी जीव द्यायला तयार आहे. अशी ही दुर्गा बापाच्या आधाराने येणाऱ्या संकटावर मात करत सुखाच्या मार्गावर जगण्याचे पाऊल टाकते. यंकूचा मृत्यू, माकडांचे मरण ही ओझी घेऊन ती येमूबरोबर भटकेगिरीवर निघते अशी ही दुर्गा माकडीच्या माळाची साथीदार होते. अण्णांच्या साहित्यातील स्त्री अपमानित लाजिरवाणी नाही. तर तिची थट्टा करणाऱ्या विचार सरणीच्या विरोधात असो किंवा प्रतिकूल परिस्थितीत तिला सामर्थ्यनिशी उभा केले. भारतातील समाज व्यवस्थाही पुरुषसत्ताक आहे. त्यामुळे कोणत्याही समाजसमूहात ती बंदिस्त असते. तिचे रूप, सौंदर्य हे तिच्या छळाचे कारण असते. तर अगतिकता,

निराधारपणा, असहाय्यता हे तिच्या दु:खाचे कारण असते. या परिस्थितीही तिला नीति मूल्याचे भान असते. त्यामुळे ती कोणत्याही परिस्थितीला सामोरी जात स्वत:चे रक्षण करण्यास सिद्ध होते. एकूणच अण्णांनी 'स्त्रियांना आपल्या साहित्यातून मानाचे स्थान मिळवून दिले. ते स्त्री विषयी विकृती निर्माण करत नाहीत तर त्यांना अन्यायाविरुद्ध स्त्री अब्रु रक्षणासाठी पेटवून उठवतात.'[४] म्हणून अण्णांनी त्यांच्या कादंबरीतील नायिका खडतर जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. आपल्या परीने स्त्री जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या संस्कृतीचे जतन करणाऱ्या आहेत. आयुष्यभराचे वाट्याला दु:ख येऊन ही त्या परिस्थितीबरोबर झगडणाऱ्या आहेत. त्यामुळेच त्या कणखर बनतात. स्वत:ही जगतात आणि इतरांनाही जगविण्यासाठी धडपड करतात. यातूनच अण्णांचे वास्तववादी पुरोगामी विचार स्पष्ट होतात.

**सारांश:**

समाजवास्तवाचा शोध घेत अण्णा भाऊराव साठे यांनी मानवतावादी कार्याच्या आधीन होऊन 'माकडीचा माळ' या कादंबरीतील कथानकातून माणूस आणि माकड यांची वैचारिक देवाण-घेवाणीची सांगड घातलेली आहे आणि कोणत्याही कलाकृतीची लेखन प्रकृती ही सहेतूकच असावी अशीच त्यांची लेखनामागची भूमिका असते. या कादंबरीतील नायक पात्रे नि:स्वार्थीपणे काबाडकष्ट करून जगणारी आहेत. स्वत:च्या ध्येयाबद्दल कोणत्याही परिस्थितीत ती विचलित होणारी नाहीत. आयुष्यात खूप वेळा पचविलेला नकार या नकारात्मक घटनाच त्यांच्या सोशिक जगण्याला कारणीभूत ठरलेल्या आहेत. या कादंबरीतील पात्रे माणसे आणि माकड नावाचा प्राणीही आहे. बोधकथेतून प्राण्यांची उदाहरणे माणसांना देऊन शहाणपण सुचविले जाते. तसेच वास्तव या कादंबरीत आलेले आहे. या कादंबरीतील घटना-प्रसंगातून अण्णांच्या काळापासून ते आजतागायतपर्यंतच्या भटक्या-विमुक्तांच्या जीवनातील नकारात्मकता नाहीशी करण्यासाठी आयुष्यभर पुरेल इतके कार्य करण्याची व निराशेवर मात करण्याची शक्ती व सामर्थ्य त्यांनी अक्षररुपी साहित्य निर्माण केलेले आहे. एकूणच 'माकडीचा माळ' या कादंबरीतून भटक्या-विमुक्त्यांच्या समाजव्यवस्थेचे वास्तव रूप आहे. या समाजातील रोटी-बेटी, रोजचे जीवन व्यवहार, त्यांची जगण्याची पद्धती, जात पंचायती यासारखे अनेक प्रश्न त्यांच्या रोजच्या जगण्याचा भाग आहे. हे त्यांनी आवर्जून सांगितलेले आहे. विषमतेमुळे समाजमनावर होणारा परिणाम हा जीवन मूल्यांवर होतच आसतो. त्यांची लेखक म्हणून जगण्याकडे बहाण्याची भूमिका बोधवादी आहे. या भुमिकेतूनच ते तळागाळातील समाजाकडे बघतात. याचे उत्तम उदाहरण म्हणून 'माकडीचा माळ' या कादंबरीकडे पहाता येते.

**संदर्भटिपा:**

१) साठे अण्णा भाऊ - 'बरबाद्या कंजारी', विद्यार्थी प्रकाशन पुणे, नवीन आवृत्ती, २००८ प्रस्तावना

२) सकटे मच्छिंद्र - 'अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक', प्रज्ञा प्रकाशन,कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ३ जानेवारी २०२५, पृ. १४२

३) कानगो भालचंद्र (संपा), 'युगांतर साप्ताहिक: २७ जुलै ते २ ऑगस्ट २००३, पृ. १६

४) गारोडे प्रमोद - 'अण्णाभाऊंचे कादंबरी विश्व', कमल प्रकाशन, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००६, पृ.क्र. १७६